लक्ष्मीकांत-प्यारेलाल - भाग १

संगीत दिग्दर्शक लक्ष्मीकांत यांचं जेव्हा निधन झालं तेव्हा काही लोक म्हणाले होते, 'Laxmikant is no more, but Pyarelal is no less'

या संगीतकार जोडगोळीतील उरलेला संगीतकार एकटादेखील आपल्यासाठी श्रवणीय गाणी देऊ शकेल अशी या लोकांना आशा होती. पण दुर्दैवाने ती फोल ठरली. बँकेत जॉईंट अकाउंट असलेल्या दोन व्यक्तींपैकी एका व्यक्तीचं निधन झालं तर उरलेली व्यक्ती त्या अकाउंटचा कारभार व्यवस्थितपणे निभावून नेऊ शकते, पण कलेच्या क्षेत्रात तसं होईलच असं नाही. संगीत-दिग्दर्शनाच्या कार्यक्षेत्रात ३५ वर्षं त्यांच्याबरोबर काम करणारा त्यांचा जोडीदार निघून गेल्यामुळे व त्यांची स्वत:चीही तब्येत ठीक नसल्यामुळे चांगलं संगीत देणं तर दूरच राहिलं, प्यारेलाल यांचं व्यक्तीगत आयुष्यदेखील पूर्ववत राहिलं नाही.

या जोडगोळीच्या कार्यक्षमतेमुळे व कामाची जबाबदारी वाटून घेण्याच्या त्यांच्या पध्दतीमुळे त्यांनी आपल्याला उत्तमोत्तम (काही तर अगदी अतुलनीय) गाणी दिली. मधुर चाल लावणं हे लक्ष्मीकांतचं काम होतं, तर वृंदवादन ही प्यारेलालची जबाबदारी होती. ह्या नियोजनामुळेच त्यांना इतक्या अमर्याद संख्येत गाणी देता आली आणि चित्रपटक्षेत्रातील इतर कुठल्याही जोडीपेक्षा त्यांची जोडी अधिक काळ टिकली. अर्थात याला इतरही कारणं होती. सोप्या व लडिवाळ चाली, भरपूर वाद्यवृंद, ढोलकीचा योग्य व वारंवार वापर ही त्यांतली काही. 'संगीतामुळेच चित्रपट चालतो' या उक्तीवर पुरेपूर विश्वास असल्याने ते व्यवस्थित वेळ व लक्ष देऊन चित्रपटाचं कथानक व गाण्याच्या वेळचा प्रसंग नीट समजून घेत आणि मगच चाल बांधत.

लक्ष्मीकांत शांताराम कुडाळकर यांचा जन्म १९३७ मध्ये झाला. ते लहान असतानाच त्यांचे

वडील वारले. त्यामुळे त्यांना शिक्षण अर्धवट सोडून द्यावं लागलं. पण त्यांना संगीताची आवड होती आणि त्यात विशेषकरून त्यांना शंकर-जयकिशन यांची गाणी आवडत. त्यामुळे त्यांनी त्या दिशेने पावलं उचलली आणि मँडोलिन गुरु हुसेन अली यांच्याकडे मँडोलिन शिकायला सुरुवात केली.

प्यारेलाल यांचा जन्म १९४० मध्ये झाला. त्यांचे वडील रामप्रसाद शर्मा हे ट्रंपेट वाजवीत व १९४० च्या दशकाच्या उत्तरार्धात त्यांनी काही चित्रपटांना संगीतही दिलं. छोट्या प्यारेलालचाही संगीताकडे कल आहे हे लक्षात येताच या संगीतकार पित्याने त्यांना संगीताचं शिक्षण द्यायचं ठरवलं व त्याप्रमाणे छोटा प्यारेलाल व्हायोलिन शिकू लागला.

तरुणपणी लक्ष्मी व प्यारे हे दोघंही आधी ऑर्केस्ट्रात वाद्यं वाजवित होते. मग त्यांना इतर वादकांना चाल शिकवायचं व कुठलं वाद्य गाण्यात कधी वाजवायचं ते ठरवायचं काम मिळालं. त्यानंतर प्रथम लक्ष्मीकांत व मग प्यारेलाल यांनी काही वर्षं 'मदारी', 'सट्टा बाजार', 'छलिया', आणि 'दिल भी तेरा, हम भी तेरे' या चित्रपटांच्या संगीत-दिग्दर्शनात कल्याणजी-आनंदजी यांचे सहाय्यक म्हणून काम केलं. या अनुभवानंतर ते स्वतंत्रपणे संगीत-दिग्दर्शन करण्यास सज्ज झाले.

१९६२ मध्ये भोजपुरी चित्रपट-निर्माते के. परवेझ यांनी लक्ष्मीकांत व प्यारेलाल यांना एकाच वेळी चार चित्रपटांचं संगीत-दिग्दर्शन देऊ केलं. ही सुवर्णसंधीच होती. पण कसचं काय ? करारपत्रावरची शाई वाळायच्या आतच ह्या निर्मात्याचं दिवाळं वाजलं. मग १९६३ मध्ये बाबुभाई मिस्त्री यांनी त्यांना 'पारसमणी'चं संगीत-दिग्दर्शन करायला देऊन स्वतंत्रपणे संगीत-दिग्दर्शन करायची पहिली संधी दिली. लक्ष्मीकांत-प्यारेलाल (ज्यांना नंतर एल.पी. असं आद्याक्षरांनी संबोधलं जाऊ लागलं) यांनी 'पारसमणी'तील गाण्यांना चित्तवेधक चाली लावल्या. या गाण्यांच्या यशानंतर त्यांची कीर्ती दुमदुमली व त्यानंतरच्या चित्रपटांनाही त्यांनी असंच द्णक्यात संगीत-दिग्दर्शन केलं.

त्यांच्या सुरुवातीच्या काळातील चित्रपटांतील ही काही गाणी आहेत :

Song	Singer	Film
Mere dil mein, halki si	Lata	Parasmani
Raushan tumhin se duniya	Rafi	Parasmani
Woh jab yaad aaye	Rafi & Lata	Parasmani
Hasta hua nooraani chehra	Lata & Kamal Barot	Parasmani
Jagat bhar ki roshni ke liye	Hemant Kumar	Harishchandra Taramati
Jeevan dor tumhin sang baandhi	Lata	Sati Savitri
Jyot se jyot jalaate chalo	Mukesh/Lata	Sant Gyaneshwar
Jaane walo zara	Rafi	Dosti
Chahoonga main tujhe	Rafi	Dosti
Abhi kamsin ho	Rafi	Aaya Toofan
Chali ri chali re gori	Kishore & Lata	Mr. X in Bombay
Mere mehboob qayamat hogi	Kishore	Mr. X in Bombay
Pyaar baant-te chalo	Kishore	Hum Sab Ustad Hain
Ajnabi tum jaane pehchaane se lagte ho	Kishore/Lata	Hum Sab Ustad Hain
Saawan ka mahina	Mukesh & Lata	Milan
Tum bin jeevan kaise beeta	Mukesh	Anita
Dil-vil, pyaar-vyaar main kya jaanu	Lata	Shagird
Aa, jaan-e-jaan	Lata	Inteqaam
Jo unki tamaana hai barbaad hoja	Rafi	Inteqaam
Khizan ke phool se aati kabhi	Kishore	Do Raaste
Bindiya chamkegi	Lata	Do Raaste
Do din ki zindagi	Lata	Satyakam
Ek tera saath	Rafi & Lata	Waapas
Khilona jaan kar tum to	Rafi	Khilona
Khush rahe tu sada	Rafi	Khilona
Agar dilbar ki ruswayee humen	Lata	Khilona
Jhilmil sitaron ka aangan hoga	Lata & Rafi	Jeevan Mrityu
Shareefon ka zamaane mein	Lata	Sharafat
Achha to hum chalte hain	Kishore, Lata	Aan Milo Sajna

आणि ही गाणी १९७० पर्यंतची आहेत ज्या काळात त्यांच्या संगीतात नाट्यपूर्ण वृंदवादनाचे उद्रेक असत. हे दशक ओलांडल्यावर मेलडीचा जमाना पाठी पडला आणि चित्रपट व संगीत निर्मितीत खळबळजनक बदल घडून आले. श्रोत्यांची अभिरुची इतकी बदलली असतानाही पुढील दशकांमध्येसुध्दा या दोघांनी सुंदर संगीत दिलं ही एक असमान्य गोष्ट आहे. शिवाय हेही लक्षात घेतलं पाहिजे की त्या काळात पूर्वीच्या सर्जनशील संगीतकारांपैकी अनेकांचं निधन तरी झालं होतं किंवा ते आता संगीतक्षेत्रात कार्यरत नव्हते. संगीतकारांना टिकून रहायचं असेल तर काळाप्रमाणे बदलणं भाग होतं. लक्ष्मीकांत-प्यारेलालनी बदलाचा नुसता स्वीकार केला असं नाही तर कित्येकदा त्यांनीच बदल घडवून आणण्यात पुढाकार घेतला आणि त्यामुळेच या स्पर्धेत ते इतरांपेक्षा कितीतरी पुढेच राहिले. 'आन मिलो सजना' चित्रपटातील 'अच्छा तो हम चलते है' गाण्यातील गाणे-आणि-बोलणे पध्दतीचा वापर हे या बदलाच्या प्रयत्नाचं एक उदाहरण आहे. त्यांच्या 'कर्ज' मधील 'मेरी उमर के नौजवानो...ओम शांती ओम' या भजनाचा बाज असलेल्या गाण्याला त्यांनी पूर्णत: डिस्कोचा साज दिलेला आहे. त्याच चित्रपटातील 'दर्द-ए-दिल, दर्द-ए-जिगर' या गझल-सदृश्य गाण्याचं त्यांनी पॉप गाण्यात रुपांतर केलेलं आहे. त्यांच्या अतिशय गाजलेल्या 'वन टू का फोर' या 'राम-लखन' चित्रपटातील गाण्यात त्यांनी ७२ आघात (percussion) वाद्यांचा उपयोग केलेला आहे, पण एकही तंतुवाद्य किंवा फुंकून वाजवायचं वाद्य (wind instrument) वापरलेलं नाही.

त्यांनी बर्याच शीर्षकगीतांना चाली लावल्या आहेत. उदा. 'ओ मनचली, कहा चली' ('मनचली'), 'मै तुलसी तेरे ऑंगन की' (चित्रपटाचंही नाव तेच), 'ईश्वर सत्य है' ('सत्यम शिवम सुंदरम'), 'जानेमन' (चित्रपटाचंही नाव तेच), 'आप के अनुरोध पे' ('अनुरोध'), 'अनहोनी को होनी करदे' ('अमर अकबर ऍंथनी'), 'शरीफोंका जमानेमे' ('शराफत'), 'ड्रीम गर्ल' (चित्रपटाचंही नाव तेच), 'पिया का घर' (चित्रपटाचंही नाव तेच), 'रंग रंग के फूल खिले' ('आन मिलो सजना'), 'कच्चे धागे के साथ जिसे' ('कच्चे धागे'), 'मैने देखा, तुने देखा' (दुष्मन'), 'मन की प्यास मेरे' ('जल बिना मछली'), 'प्यार को चाहिये क्या' ('एक नजर'), 'खिलौना जान कर तुम तो' ('खिलौना'), 'दो रंग दुनिया के और' ('दो रास्ते') इ. इ.

संगीतप्रेमींच्या मते हे काही नवं नाही. पण हळूहळू जास्त जास्त चित्रपटांची जाहिरात त्यातल्या एखाद्या गाण्याद्वारे केली जाऊ लागली, मग ते छानसं शीर्षकगीत असेल तर उत्तमच, ना ? लक्ष्मीकांत प्यारेलालनी हा विचार उचलून धरला.

- माणेक प्रेमचंद

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून)

NOTE: Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least.

'Yesterday's Melodies Today's Memories' is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand, the author, has also recently written another music book called Musical Moments From Hindi Films, celebrating 75 years of sound (and music) in Hindi Films. To buy the books, you may go to jharnabooks@yahoo.com, and to write to the author, the email address is manekpremchand@gmail.com